डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव
कबचौउमवि, जळगाव संलग्नित "स्वायत्त महाविद्यालय"
कबचौउमवि, जळगावतर्फे "उत्कृष्ट महाविद्यालय २०२०-२१" पुरस्कार प्राप्त
नॅक पूनर्मूल्यांकित अ श्रेणी (३.१२ सी.जी.पी.ए. तिसरी फेरी)

फोन : ०२५७ - २२३६०५१

---

## शिष्यवृत्ती विभाग दिनांक २९/०८/२०२६

## सूचना

## फक्त ST विद्यार्थिनींसाठी वर्ष २०२६-२७

वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अनुसूचित जमातीच्या (ST) प्रवर्गातील विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थिनींना **शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही,** अशा विद्यार्थिनींसाठी **" पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयमं योजना "** सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी पदवी व पदव्युत्तर वर्गांमधील अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थिनींना https://swayam.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून अर्जाची प्रिंट काढून त्यास आवश्सक कागदपत्रे जोडून कार्यालयात जमा करावी.

1. **वसतीगृहात गुणवत्ता यादी द्वारे निवड झाल्यास विद्यार्थिनी जर वसतिगृहातील प्रवेश निश्चित केला नाही किंवा अर्ज रद्द करून घेतला तर विद्यार्थिनीना स्वयंम योजनेचाही लाभ मिळणार नाही.**
2. विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष सन 2026-27 साठी पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे,** विद्यार्थिनीं या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात.
3. विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची स्वच्छ प्रत संकेतस्थळा /मार्फत सादर(Upload ) करावी.
4. विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये स्वत:चाच मोबाईल क्रमांक नोंद (entry) करावा. मोबाईल क्रमांकाची नोंद करताना सदर मोबाईल क्रमांक आधार क्रमांकासोबत registered असावा. जेणेकरून आधार संलग्न मोबाईल क्रमांकाचा वापर केल्यामुळे विद्यार्थी पडताळणी करणे सोपे होईल.
5. ऑनलाईन अर्जामध्ये विद्यार्थ्यांनी स्वत:चे नाव नोंदणी करताना सदर नाव हे आधार कार्ड वरील नावाप्रमाणेच तंतोतंत असावे.
6. स्वयम् योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी आधार क्रमांकाची नोंद (entry) करताना त्यांचा आधार क्रमांक suspend झाला नसल्याची खात्री करून घेणे. तसेच आधार क्रमांक suspend झाला असल्यास तो कार्यरत करून मगच त्याची नोंद करणे अनिवार्य आहे.
7. विद्यार्थ्यांनी त्यांचा बँक खाते क्रमांक नोंद (entry) करण्यापूर्वी सदर बँक खाते कार्यरत असल्याची खात्री करावी. बँक खाते कार्यरत नसल्यास योजनेंतर्गत लाभ देताना अडचणी येतात. तसेच सदर बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केलेले असावे. बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न नसल्यास संबंधित बँक शाखेत जाऊन ते आधार संलग्न करून घ्यावे.
8. ऑनलाईन अर्ज करताना अभ्यासक्रम/शिक्षण संस्था उपलब्ध नसल्यास/दिसत नसल्यास याबाबत अशा प्रकरणी संबंधित प्रकल्प कार्यालयात भेट देऊन ही बाब संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.
9. अर्ज करताना अर्जात चुकीची माहिती सादर केल्यास, जर अर्ज रद्द झाला किंवा लाभ मिळण्यास विलंब / लाभ रद्द झाल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार जबाबदार राहील.

**फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे.**

**१. आधार कार्डची झेरॉक्स प्रत.**
**२. जातीची वैधता / जातीचा दाखला झेरॉक्स प्रत.**
**३. वडिलांचा उत्पन्नाचा दाखला झेरॉक्स प्रत. (उत्पन्न मर्यादा २,५०,०००)**
**४. डोमीसाईल सर्टिफिकेट.**
**५. महाविद्यालयाचे प्रवेश पावती व बोनाफाईड**
**६. बँक पासबुक झेरॉक्स प्रत.**
**७. पालकांचे व विद्यार्थिनीचे घोषणा पत्र.**
**८. मागील वार्षिक परीक्षेचे गुणपत्रक.**
**९. १० वी व १२ वी चे गुणपत्रक.**
**१०. १०० स्टॉप पेपर वर भाडे करारनामा (नोटरी )**

PRINCIPAL
Dr. Annasaheb G.D. Bendale
Mahila Mahavidyalaya, Jalgaon